नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/११/२०२६ (रविवार)

मा. मुख्यमंत्री महोदयांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील लोहारी सावंगा येथील दौरा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला

मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य आणि मा.ना.श्री चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री नागपुर यांच्या नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील लोहारी सावंगा येथील दौऱ्यादरम्यान त्यांनी शेतकरी बांधवांच्या निवासस्थानी भेट देऊन एक दिवस मुक्काम करून त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली तसेच शेतकरी बांधवाशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या व शेतीविषयक परिस्थिती जाणून घेतली.

मा. महोदयांच्या दिनांक ०७/११/२०२६ रोजी आणि दिनांक ०८/११/२०२६ रोजीच्या या महत्वपुर्ण दौऱ्या दरम्यान शेतकरी बांधवांशी संवाद,लोकप्रतिनिधींची बैठक, क्षेत्रीय पाहणी तसेच दुष्काळग्रस्त शेती व जलसंधारण कामाची पाहणी अशा अनुषंगाने त्यांनी एकूण ७ विविध ठिकाणी भेटी दिल्या. या सर्व ठिकाणी तसेच दौऱ्यादरम्यानच्या सुमारे १९० किलोमीटरच्या संपूर्ण प्रवास मार्गावर नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून चोख सुरक्षा व्यवस्था व बंदोबस्ताचे नियोजन करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

मा. महोदयांच्या या संपूर्ण दौऱ्याच्या अनुषंगाने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते. सदर बंदोबस्तासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दलासह नागपूर परिक्षेत्रातील इतर पोलीस घटकांमधूनही अधिकारी व अंमलदार मागविण्यात आले होते.

मा. महोदयांच्या या दौऱ्यादरम्यान संपूर्ण प्रवासादरम्यान मार्गावरील सुरक्षा, वाहतूक नियोजन, कार्यक्रमस्थळांची सुरक्षा, गर्दी नियंत्रण तसेच आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोर नियोजन करण्यात आले होते. दौऱ्यातील प्रत्येक कार्यक्रमस्थळी आवश्यकतेनुसार पोलीस अधिकारी व अंमलदारांची नियुक्ती करून बंदोबस्ताची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली.

मा. वरिष्ठ पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक श्री. अनिल म्हस्के यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलीस दल व नागपूर परिक्षेत्रातील बंदोबस्तात हजर सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या समन्वयातून मुख्यमंत्री महोदयांचा संपूर्ण दौरा शांततेत, सुरक्षित वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

दिवाळीनिमित्त नागपूर ग्रामीण पोलीस दलाचा सामाजिक बांधिलकीचा उपक्रम; अनाथ, निराधार, ज्येष्ठ नागरिक ,गरजू कुटुंब आणि शेतकरी बांधव यांच्या सोबत दिवाळीचा आनंद

दिवाळी हा आनंद, उत्साह आणि आपुलकीचा सण असून या सणाचा आनंद समाजातील प्रत्येक घटकाला मिळावा, या उद्देशाने नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने दिवाळीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. समाजातील अनाथ बालके, अंध विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, आदिवासी बांधव, शेतकरी तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करून नागपूर ग्रामीण पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपली. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच मा. श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनच्या वतीने हे उपक्रम राबविण्यात आले.

पोलीस स्टेशन पारशिवणी :— या उपक्रमांतर्गत परशिवनी पोलीस स्टेशनच्या वतीने परशिवनी तालुक्यातील मकरधोकडा या आदिवासी गावातील ५० गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त नवीन कपडे व मिठाईचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रम परशिवनी तालुका प्रशासन, पोलीस प्रशासन, पत्रकार संघ तसेच आकाश झेप फाउंडेशनचे पदाधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या माध्यमातून आदिवासी बांधवांच्या कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

पोलीस स्टेशन पाचगाव :— पाचगाव पोलीस स्टेशनच्या वतीने कळमना टाकळी येथील मातृशक्ती वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना मिठाई व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधत त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद साजरा करण्यात आला.

पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी :— एमआयडीसी बुटीबोरी पोलीस स्टेशनच्या वतीने कवी मिरासूत अंध उद्योग मंदिर येथील अंध विद्यार्थ्यांना नवीन कपडे व मिठाईचे वाटप करण्यात आले. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेत त्यांच्याप्रती आपुलकी व्यक्त करण्यात आली.

पोलीस स्टेशन बुटीबोरी:— बुटीबोरी पोलीस स्टेशनच्या वतीने साथ फाउंडेशन संचालित पुनर्जन्म आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना दिवाळीनिमित्त मिठाईचे वाटप करण्यात आले. आश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत दिवाळी साजरी करून त्यांना सणाच्या आनंदात सहभागी करून घेण्यात आले.

पोलीस स्टेशन सावनेर :— सावनेर पोलीस स्टेशनच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रम तसेच हेटी शिवारातील शेतकरी बांधवांना दिवाळीनिमित्त मिठाई व इतर साहीत्याचे वाटप करण्यात आले. तसेच आदर्श शरण स्थान बॉईज होम वाघोडा येथील लहान मुलांना नवीन कपड्यांचे व माठाईचे वाटप करून त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यात आली. या उपक्रमातून ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व शेतकरी बांधवांसोबत सणाचा आनंद वाटून घेण्यात आला.

पोलीस स्टेशन कुही :— कुही पोलीस स्टेशनच्या वतीने मुसळगाव येथील एका आर्थिकदृष्ट्य दुर्बल कुटुंबाला दिवाळी सण साजरा करता यावा, यासाठी दिवाळी फराळाचे पदार्थ तसेच सणासाठी आवश्यक असलेल्या विविध साहित्याचे वाटप करून मदतीचा हात देण्यात आला.

पोलीस स्टेशन देवलापार :— देवलापार पोलीस स्टेशनच्या वतीने रयतवाडी परिसरातील एका निराधार वृध्द महिलेला तसेच गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त मिठाई व जीवनावश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून निराधार महिला आणि गरजू कुटुंबासोबत दिवाळीचा आनंद वाटून सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अशा प्रकारे नागपूर ग्रामीण पोलीस दलातील विविध पोलीस स्टेशनच्या वतीने समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून दिवाळीचा आनंद वाटण्यात आला. केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरते मर्यादित न राहता समाजातील गरजू, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांच्या आनंदात सहभागी होऊन पोलीस दलाने सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला.


वर्ष १५ वे
वस्त्रदान, मिठाई, वस्तुती साहित्य वितरण
व
नि:शुल्क आरोग्य तपासणी शिबीर
दिवाळी मिलन कार्यक्रम
ग्रामपंचायत अधिकारी संघटना
पंचायत समिती पारशिवनी
सर्व गावकरी नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा...!






Cake




मातृशक्ती वृध्दाश्रम
स्व. भानुताई जयरामजी गडकरी
भोजनकक्ष







अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद
पारशिवनी पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन पारशिवनी :— दिनांक ०८/११/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, नवेगाव खैरी पेंच डॅम परिसरात अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नवेगाव पेंच डॅम नदी येथे जावुन पाहणी केली असता संशयीत ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/डी.ई—२८४८ हे ट्रॉली क्र. एम एच—४०/एल—८८०२ सह मिळुन आले. वाहन थांबवुन पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. सदर वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता **आरोपी नामे संदिप दशरथ धोटे, वय २८ वर्ष, रा. कोंडासावळी, ता. पारशिवनी** अशी माहीती प्राप्त झाली. मालकाबाबत विचारपुस केली असता मालक स्वत:च असल्याचे सांगितले. चालकाला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर क्र. एम एच—४०/डी.ई—२८४८ किंमती व ट्रॉली क्र. एम एच—४०/एल—८८०२ किंमती ३,७०,०००/—रूपये आणि ३५० ते ४०० घमेले रेती किंमती ६,०००/— रूपये आणि असा एकुण **३,७६,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन नमुद चालक /मालक याच्या विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं., सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोखंडी गेट अंगावर पडून तीन वर्षीय बालिकेचा मृत्यू
निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभूत ठरणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन खापा:— दिनांक ०७/११/२०२६ रोजी खापा पोलीस स्टेशन येथे फिर्यादी सौ. मोनाली मनोज खुबाळकर, वय ३० वर्ष, रा. खुबाळा, ता. सावनेर, जि. नागपुर यांनी फिर्याद दिली की, मौजा खुबाळा येथे फिर्यादी यांची मुलगी मृतक नामे गौवरांशी मनोज खुबाळकर, वय ०३ वर्षे ही दिनांक २७/१०/२०२६ रोजी १६/३० वा. चे दरम्यान

आरोपी नामे कपील खुशाल खुबाळकर, रा. खुबाळा याचे घराचे वॉल कंम्पाउंड चे लोखंडी चॅनल गेट जवळ खेळत असतांना सदर गेट कपील खुबाळकर यानी निष्काळजीपणाने व बेजबाबदारपणे धोकादायक नादुरुस्त स्थितीत ठेवल्यामुळे खेळत असलेल्या बालिकेच्या अंगावर ते पडले. त्यामुळे बालिकेला गंभीर दुखापत झाली व उपचारा दरम्याण मरण पावली आहे. तिचे मरणास आरोपी नामे कपील खुशाल खुबाळकर, रा. खुबाळा हा कारणीभूत झाला.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी कपील खुशाल खुबाळकर, रा. खुबाळा याचे विरूद्ध कलम १०६(१) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

अवैध दारू विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ०२ गुन्हे दाखल

दिनांक ०७/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची विक्री, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०२ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपी नामे रजनिश विनायक वासनिक, वय ४२ वर्ष, रा. निहारवाणी, ता. मौदा जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद. **नमुद कारवाईत एकुण २७०० मिली देशी दारू असा एकुण १२००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर